**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2021 = 7.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JULY-AUGUST, 2021, VOL- 9/66*

# औरंगाबाद शहरातील माध्यमिक व उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलींसाठी शासनाच्या विविध योजनांचा मुलींच्या सक्षमीकरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास

**थोरात संगिता अशोकराव[१] & एस. एस. पाठक[२], Ph. D.**

*[१] संशोधक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

*Gmail- sangitathorat2088@gmail.com*

*[२] सहाय्यक प्राध्यापक, मार्गदर्शक, शिक्षणशास्त्र विभाग, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद*

*Gmail- sspathak2010@gmail.com*

**Abstract**

*शिक्षणातून स्त्री निर्भय व स्वावलंबी आणि सक्षम बनून सुशिक्षित व सुसंस्कृत होवून तीचे सक्षमीकरण होते. म्हणून मुलींना त्यांची परिस्थिती व समस्या सोडविण्यासाठी सक्षम करणे हा एक रामबाण उपाय आहे. स्त्रियांना आतापर्यंत झालेल्या अन्यायाचे परिमार्जन करणे, त्यांना समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने स्थान देणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांना त्यांचे सर्व न्यायहक्क मिळवून देणे आणि समाजात त्यांना सन्मानाने व प्रतिष्ठेने जीवन जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजेच महिलांचे (मुलींचे) सक्षमीकरण होय. हे सक्षमीकरण शासनाच्या विविध योजनांमुळे पूर्ण होते.*

*मुलींना शिक्षण घेतांना अनेक प्रकारच्या समस्या येतात. त्या समस्या मुली खंबीरपणे सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. त्यातुनच त्याचे सक्षमीकरण झालेले दिसून येते. मुलींना सक्षम व स्वावलंबी बनविणे व त्याचा विकास करणे अत्यंत आवश्यक आहे*

Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com

**प्रस्तावना:**

भारतीय संविधानाने स्त्री-पुरुष समानता हे तत्व स्विकारले. त्यामुळे स्त्रियांना राजकीय व इतर सर्व हक्क प्राप्त झाले. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांना शिक्षणाच्या व रोजगाराच्या समान संधी मिळाल्या. त्यामुळे आधुनिक अथवा संगणकाच्या युगामध्ये स्त्रियांना समानसंधी प्राप्त झाली. तरीपण धार्मिक रुढी व परंपरा यांच्या नावाखाली स्त्रियांना कितीतरी वर्षे शिक्षणापासून विकासापासून वंचित राहावे लागले. त्यामुळे सामाजिक, आर्थिक व राजकीय अशा सर्व क्षेत्रात स्त्रियांचे स्थान दुय्यम राहिले. कुटूंबात व समाजात स्त्रियांना सन्मान मिळाला पाहिजे. जगात ईश्वरभक्ती सर्वत्र व्यापलेली आहे. स्त्री ही त्याच शक्तीचा अविष्कार आहे. हे विचार प्रत्येक थोर समाजसुधारकाचे आहेत. म्हणूनच अमेरिकेतील प्रत्येक माणूस या उदात्त भावनेने स्त्रीकडे पाहतो म्हणूनच ते संपन्न व शिक्षित आहेत. आपल्या देशाच्या अवनती मागे स्त्रियांना दिलेला गौण दर्जा होय. शिक्षणातून स्त्री निर्भय व स्वावलंबी आणि सक्षम बनून सुशिक्षित व सुसंस्कृत होवून तीचे सक्षमीकरण होते. म्हणून मुलींना त्याची परिस्थिती व समस्या सोडविण्यासाठी सक्षम करणे हा एक रामबाण उपाय आहे. स्त्रियांना आतापर्यंत झालेल्या अन्यायाचे

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

परिमार्जन करणे, त्यांना समाजजीवनाच्या सर्व क्षेत्रांत पुरुषांच्या बरोबरीने स्थान देणे, त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविणे, त्यांना त्यांचे सर्व न्यायहक्क मिळवून देणे आणि समाजात त्यांना सन्मानाने व प्रतिष्ठेने जीवन जगता येईल अशी व्यवस्था निर्माण करणे म्हणजेच महिलांचे (मुलीचे) सक्षमीकरण होय. मुलींना माध्यमिक व उच्च शिक्षण घेण्यासाठी त्यांना मानसिक आधार देणे. त्यांच्या सुप्त शक्तीचा विकास करणे तसेच त्यांना स्वावलंबी करुन त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करुन त्यांना सक्षम करणे हे खुप महत्वाचे आहे. पण सद्यस्थितीमध्ये मुलींना प्रत्येक क्षेत्रात सुरक्षित व संरक्षण प्राप्त करुन देणे गरजेचे आहे. त्यामुळे त्यांना मानसिक, आर्थिक, सामाजिक आधाराची आवश्यकता आहे. तसेच मुलींचे सक्षमीकरण करण्यासाठी त्यांना शासनाच्या विविध योजनाची माहिती असणे आवश्यक आहे. त्या योजनामुळे त्याचे आर्थिक प्रश्न कमी होण्यास मदत मिळते. त्यामुळे मुलींना येणाऱ्या समस्यांना खंबीरपणे पुढे जातात. त्यातूनच त्या सक्षम होतात

**संशोधनाची गरज :**

१. महागड्या शिक्षणाने गरीब-श्रीमंत अशी दरी निर्माण झाली आहे. गरीब-श्रीमंत ही दरी कमी करुन सक्षमीकरण करणे गरजेचे आहे. त्यामुळे मुलीचे सक्षमीकरण शासनाच्या विविध योजनेमधून होणे गरजेचे आहे.

२. गरीबांच्या शाळा, श्रीमंतांच्या शाळा अशी विषमता निर्माण आली ही विषमता कमी करण्यासाठी शासनाच्या विविध योजनांची माहिती होणे गरजेची आहे.

३. मुलींना प्रत्येक स्तरावर अनेक समस्या येतात. त्यामुळे आर्थिक समस्या, सामाजिक समस्या, मानसिक समस्या, शैक्षणिक समस्या या समस्यावर मात करणे गरजेचे आहे.

४. मुलींना माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी काही कुटूंबाचा विरोध असतो. त्यामुळे पालक मुलींच्या शिक्षणाबद्दल उदासीन असतात. त्याची उदासिनता दूर करणे गरजेचे आहे.

५. मुलींच्या उज्वल भविष्यासाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेवून मुलींचे सक्षमीकरण करणे गरजेचे आहे.

६. काही वेळेस योजनेचा लाभ घेतांना अनेक तांत्रिक अडचणी व त्रुटी येत असतात. त्या अडचणीचा व त्रुटीचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

७. समाजातील प्रत्येक घटकातील विद्यार्थी शिकला पाहिजे या धोरणाने अनेक योजना सरकार राबवते. तरी पण अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षणापासून वंचित राहतात. त्याचे कारण म्हणजे सामाजिक भेदभाव आहे. सामाजिक भेदभावाचा अभ्यास करणे गरजेचे आहे.

**संशोधनाचे महत्त्व :**

१. सबलीकरणामुळे एक प्रकारच्या स्वावलंबनाकडे वाटचाल करतील.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

२.कोणत्याही समाजाच्या विकासासाठी महिलांचे (मुलींचे) आर्थिक, सामाजिक आणि राजकीय सक्षमीकरण आवश्यक आहे.

३. माध्यमिक व उच्च शिक्षण घेतांना मुलींना त्या-त्या स्तरावर येणाऱ्या समस्या सोडविण्यासाठी मुलींना सक्षम करुन त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करणे महत्वाचे आहे.

४.माध्यमिक व उच्च शिक्षण घेतांना काही मुली अत्यंत प्रतिभावंत असतात. पण त्यांची आर्थिक स्थिती बेताची असल्यामुळे त्यांना आर्थिक समस्या येतात. त्या सोडविण्यासाठी शासनाच्या योजनांचा उपयोग होतो. त्यामुळे त्यांचे सक्षमीकरण होण्यास मदत होते.

**संशोधन गृहीतके :**

१. औरंगाबाद शहरातील माध्यमिक व उच्च शिक्षण घेतांना मुलींना अडचणी येतात.

२. शिक्षण घेताना मुलींना असुरक्षित वाटते.

३. उच्चशिक्षण घेतांना काही मुलींच्या कुटूंबात विरोध असतो.

४. मुलींना उच्च शिक्षण घेतांना समाजमाध्यमातून विरोध असतो.

५. काही मुलींची कौटुंबिक व आर्थिक स्थिती चांगली नसते.

६.शासनाच्या विविध योजनांचा लाभ मुली घेतात. त्यामुळे त्यांच्या सक्षमीकरणावर परिणाम होतो.

**संशोधनाची उद्दिष्टे :**

१) औरंगाबाद शहरातील माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींचा शोध घेणे.

२) औरंगाबाद शहरातील माध्यमिक व उच्च शिक्षण घेतांना मुलींना येणाऱ्या समस्यांचा शोध घेणे.

३) मुलींना शासनाच्या विविध योजनाची माहिती देणे.

४) मुली समक्ष होण्यासाठी शासनाने राबविलेल्या विविध उपक्रमांचा शोध घेणे.

५) मुलीचे सक्षमीकरण होण्यासाठी वेगवेगळ्या उपाययोजना सुचविणे.

६) मुलीचे सक्षमीकरण होण्यासाठी स्वावलंबन व आत्मविश्वास निर्मिती यासारख्या वेगवेगळ्या कार्यक्रमाची माहिती घेणे.

**परिकल्पना :**

१) औरंगाबाद शहरातील माध्यमिक व उच्च शिक्षण घेतांना मुलींना अनेक समस्या येत असतील.

२) माध्यमिक व उच्च शिक्षण घेणाऱ्या मुली शासनाच्या विविध योजनाचा लाभ घेत असतील.

३) शासनाच्या विविध योजनामुळे मुलींच्या सक्षमीकरणावर परिणाम होता.

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

**संशोधनाचा न्यादर्श :**

औरंगाबाद शहरातील औरंगपुरा परिसरातील माध्यमिक व उच्चशिक्षण घेणाऱ्या मुलीं व शिक्षक प्रस्तुत संशोधनातील जनसंख्या आहे. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधिकेने औरंगाबाद शहरातील औरंगपुरा परिसरातील माध्यमिक व उच्चशिक्षण घेणाऱ्या १०० विद्यार्थींनींची निवड केली आहे. तसेच संशोधनाच्या नमून्यातील १०० प्रतिसादकाची निवड नमूना म्हणून निवड केली आहे. शाळा व महाविद्यालयातील १० शिक्षकांची निवड केली आहे.

**कार्यपध्दती :**

प्रस्तुत संशोधनासाठी सर्वेक्षण पध्दतीचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये प्रश्नावली या साधनाचा वापर केला आहे.

**प्रमुख निष्कर्ष :**

१. बस-पास योजनेला सकारात्मक परिणाम माध्यमिकचे शिक्षण घेणाऱ्या मुलींकडून आला आहे.

२. माध्यमिकचे शिक्षण घेण्यासाठी मुलींना शाळेत येताना सुरक्षित वाटते.

३. मुलींना दामिनी पथकामुळे मानसिक आधार वाटतो.

४. प्रज्ञाशोध शिष्यवृत्ती परीक्षेमुळे मुलींमध्ये सकारात्मक परिणाम दिसतो.

५. दामिनी पथकामार्फत रोडरोमिओंना प्रतिबंध करते.

६. उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींना बस-पास योजनेचा लाभ घेताना अनेक अडचणी येतात.

७. मुलीचे सक्षमीकरण होण्यासाठी महाविद्यालयात स्काऊट गाईड/एन.सी.सी., आरोग्य तपासणी, कराटे (कार्यशाळा) समाजसेवा या शिबीराचे आयोजन केले जाते.

८. शासनाच्या योजनेमुळे मुली सक्षम होण्यास मदत मिळते.

९. शिक्षकांना मुलींच्या योजना राबविताना कागदपत्रासंदर्भात अडचणी येतात. त्यामध्ये तांत्रिक अडचणी व अपूर्ण माहिती ह्या बाबी दिसतात.

**संदर्भग्रंथ सूची :**

*भिंताडे वि.स. : (२००७) शैक्षणिक संशोधन पध्दती, नूतन प्रकाशन*
*दत्ता वानखेडे, (२०१७) केंद्र व राज्य शासनाच्या संपुर्ण योजना, पी.बी.डी. पब्लिकेशन.*
*डॉ.प्रकाश बोबडे : (१९९०) भारतीय समाजरचना पारंपारिक व आधुनिक, विद्या प्रकाशन*
*डॉ. प्रभाकरण हकीम : (२०१०) शैक्षणिक समाजशास्त्र, नित्यनूतन प्रकाशन*
*डॉ.सौ.किरण नागतोडे : (१९९७) शालेय व्यवस्थापन व शैक्षणिक संरचना आणि आधुनिक विचार प्रवाह, विद्या प्रकाशन.*
*डॉ.म.बा.कुंडले : (१९९६) भारतीय शिक्षणाचा इतिहास, विद्या प्रकाशन.*
*डॉ.संतोष मूळावर : (२००५) मूल्यशिक्षण-सुसंवाद, विद्या प्रकाशन.*
*डॉ.दुनाखे, अरविंद आणि देशपांडे : (२००६) प्रगत शैक्षणिक समाजशास्त्र, पुणे : नित्य नूतन प्रकाशन.*
*डॉ. विलास आढाव, (२००९) महिला सबलीकरण, प्रौढ, निरंतर शिक्षण आणि ज्ञानविस्तार विभाग प्रकाशन.*
*घोरमोडे डॉ.के.यु. : (२००८) शैक्षणिक संशोधनाची मुलतत्वे, विद्या प्रकाशन.*

*Copyright © 2021, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*